CR19840720113

(924) (909)

गुन्ह्याबाबत ठिकाणाचे नकाशे काढणेबाबत.
सातारा शहर हद्दीतील.

---

महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग,
परिपत्रक क्र. सिंओएन १९८४/१५८३४४/३६४९/ल १
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक २० जुलै, १९८४.

## परिपत्रक

महाराष्ट्र जमीन महसूल पुस्तिका खंड चार प्रकरण तीनमध्ये मंडळ निरीक्षकांची कर्तव्ये नमूद केलेली आहेत. त्यामध्ये अ. नं. २३ प्रमाणे मंडळ निरीक्षक यांनी न्यायालयांत पुरावा देण्यासाठी गुन्ह्याचे स्थळ दाखविणारा नकाशा करणेचा आहे.

ज्या शहरात नगर भूमापनाचे काम पूर्ण होऊन परिरक्षण भूमापकांची पदे निर्माण झाली आहेत अशा ठिकाणी नगर भूमापनाचे हद्दीतील गुन्ह्यांबाबत ठिकाणाचे नकाशे परिरक्षण भूमापक तयार करतात. परंतु सातारा शहरातील गुन्ह्याचे ठिकाणाबाबत नकाशे तयार करणेबाबत जिल्हा निरीक्षक तथा नगर भूमापन अधिकारी, सातारा यांनी अ. नं. २ मधील नियमांचा आधार घेऊन असे नकाशे मंडळ निरीक्षकाकडून तयार करून घ्यावेत असे सुचवि व असे नकाशे तयार करण्याचे नाकारले आहे.

याबाबत जिल्हाधिकारी, सातारा यांनी त्यांचेकडील पत्र क्र. न.भू. क्र. वि. ३०५२ दिनांक २७ डिसेंबर, १९८३ प्रमाणे शासनाकडे प्रस्ताव सादर करून आदेश देण्यास विनंती केली. सदर प्रस्ताव वाजवी असल्याबद्दल आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचेकडील पृष्ठांकन क्र. महसूल २ जमीन (ना) ४८/८४ दिनांक २१ फेब्रुवारी, १९८२ प्रमाणे शिफारस केलेली आहे.

११८१

या विषयाबाबत जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी त्यांचेकडील पत्र क्र. एस.व्ही/सी. आर. १७८०/स- ३/८४ दिनांक ५ जून १९८४ प्रमाणे सातारा नगरभूमापन हद्दीपुरते मर्यादित क्षेत्रामधील गुन्ह्यांच्या ठिकाणाचे नकाशे काढणेचे नगर भूमापन अधिकारी, सातारा यांचे कार्यालयातील परिरक्षण भूमापक यांचेकडे सोपविण्यास हरकत नाही असे सुचविले आहे.

अशी परिस्थिती इतर ठिकाणी पुन्हा उद्भवू नये या हेतूने खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत :-

( कृपया मागे पहा )

"ज्यागांवी नगर भूमापनाचे काम पूर्ण होऊन ह्यांगांवी परिरक्षण भूमापकाची नेमणूक करण्यांत आली आहे अशा नगर भूमापन हद्दीपुरते मर्यादित क्षेत्रामधील गुन्ह्यांच्या ठिकाणाचे नकाशे काढण्याचे काम संबंधित नगर भूमापन अधिकारी यांचे कार्यालयातील परिरक्षण भूमापकाने करावयाचे आहे."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-
(ना० ब० वाघ)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग.

प्रति,
जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.

---

क्रमांक एस० व्ही/सी० आर० १७८० /र-३/८४
पुणे, दिनांक 3 /8/१९८४.

प्रत/- उपसंचालक भूमि अभिलेख पुणे / मुंबई/ नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर/ सर्व अधीक्षक भूमि अभिलेख / विशेष अधीक्षक भूमि अभिलेख/ जिल्हा निरीक्षक भूमि अभिलेख / नगर भूमापन अधिकारी यांचेकडे आवश्यक कार्यवाहीसाठी.

[signature] 2/8/84

११८९

जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख (म०रा०) पुणे यांचेकरिता.

९७१२०

पोरस/१८८४.

उपसंचालक भूमि अभिलेख
यांचे कार्यालय, पुणे
दिनांक 2 AUG. 1984
शाखा
क्रमांक